# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०६/२०२४ (मंगळवार) दुपार**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १७/०६/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक बकरी ईद संबंधाने उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन कुही हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की मांढळ ते उमरेड रोडनी एक पिवळया रंगाचा टिप्पर क्रमांक MH 40 AK 5711 मध्ये महसूल विभागाने दिलेल्या परवाना व्यतिरिक्त जास्त गौण खनिज रेती वाहतूक करणार आहे. अशी खात्रीशीर खबर मिळाल्याने नमुद घटनास्थळी नाकाबंदी करून टिप्पर क्रमांक MH 40 AK 5711 चा चालक आरोपी नामे— सजनलाल जनार्दन कुसराम वय ३५ रा. सोनेगाव पोस्ट जीवनापूर हा अवैधरीत्या विनापरवाना रेतीची (गौणखनिज) वाहतुक करताना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून टिप्पर क्रमांक MH 40 AK 5711 किंमती २०,००,०००/—रू. मध्ये पाच ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. असा एकुण २०,३०,०००/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपी चालक १) सजनलाल जनार्दन कुसराम वय ३५ वर्ष रा. सोनेगाव पोस्ट जीवनापूर मालक २) मंगेश बावनकुळे, राहणार कुही यांचे विरुद्ध कलम ३७९, १०९ भादंवी सह कलम ४८(७), ४८(८) म. ज. अधी. १९६६ अन्वये पो. स्टे. कुही येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. जप्त मुद्देमाल, आरोपी व कागदपत्रे गुन्हयाच्या पुढील अन्वेषण कामी पोलीस स्टेशन कुही यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पो. उप. नी आशिष मोरखडे, पोहवा अरविंद भगत, पोहवा गजेंद्र चौधरी, पोहवा मयूर ढेकले, पोशी राकेश तालेवार, चापोशी आशुतोष लांजेवार यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर